# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 24.07.2025** **वार- गुरुवार**

---

## उपमुख्यमंत्री

पुण्याला विकासाचं केंद्र बनवण्याच्या उद्देशानं यशदा नियोजन आराखडा तयार करणार आहे; यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण निधीची तरतूद करेल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. या संदर्भात मुंबईत  मंत्रालयात आयोजित बैठकीत पवार बोलत होते. केंद्र सरकारने २०२४च्या अर्थसंकल्पात देशात १४ विकासाची केंद्र असलेली शहरं, म्हणजेच ग्रोथ हब शहरं विकसित करण्याची घोषणा केली होती; त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. राज्यातील पुणे, नागपूर, नाशिकचा यात समावेश आहे.

## मोहोळ

राज्यातील ३१ जिल्हा सहकारी बँकांपैकी काही बॅंका अडचणीत आहेत किंवा बंद आहेत. त्यामुळे संबंधित जिल्ह्यातील विविध कार्यकारी सोसायट्यांना जिल्हा बँकेकडून होणार वित्त पुरवठा बंद झाला आहे. परिणामी कर्ज मिळत नसल्याने शेतकरी अडचणीत येत आहे, यात लक्ष

घालून शेतकऱ्यांना मदत करण्याची सूचना केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला केली होती. त्यानुसार राज्य सहकारी बँकेने थेट विविध कार्यकारी सोसायट्यांना वित्त पुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे; त्याच्या कार्यवाहीलाही सुरुवात झाली आहे. या निर्णयामुळे राज्यातील अनेक सेवा सोसायट्यांना आधार मिळणार आहे.

## साखर कामगार वेतनवाढ

राज्यातील साखर कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनात दहा टक्के वाढ होणार आहे. त्यामुळे त्यांचं महिन्याचं उत्पन्न २८शे रुपयांपर्यंत वाढणार आहे. साखर कारखाना मालक प्रतिनिधी, साखर कारखाना कामगार संघटना प्रतिनिधी आणि राज्य सरकारचे प्रतिनिधी यांच्या त्रिपक्षीय समितीची बैठक साखर संकुलात नुकतीच झाली; त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.

## उड्डाणपूल

सिंहगड रस्त्यावरून स्वारगेटकडे जाण्यासाठी शिवा काशीद चौक ते हिंगणे या दरम्यान उभारण्यात आलेला उड्डाणपूल १५ ऑगस्ट रोजी वाहतुकीला खुला करण्यात येणार आहे. पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली. सिंहगड रस्त्यावरील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी महापालिकेनं २०२२मध्ये तीन उड्डाणपुलांचं काम सुरू केलं होतं, त्यातील दोन उड्डाणपुलांचं लोकार्पण झालं आहे. आता उड्डाणपुलाचा तिसरा टप्पा पूर्णत्वास जात आहे.

## लम्पी

पुणे जिल्ह्यात गोवंशीय जनावरांमध्ये लम्पी त्वचारोगाचा प्रादुर्भाव वाढत आहे. हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्ह्यात जनावरांच्या वाहतुकीसाठी नियमावली तयार करण्यात आली आहे.

वाहतूक करताना लसीकरणाचं प्रमाणपत्र बरोबर ठेवणं बंधनकारक केलं आहे. याशिवाय पुणे जिल्हा लम्पी त्वचारोगासाठी ‘नियंत्रित क्षेत्र’ म्हणून घोषित करण्यात आला आहे, असं जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. अंकुश परिहार यांनी सांगितलं.

## कुणालटिळक

भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते कुणाल टिळक यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि युवा कौशल्य दिनानिमित्त नोकरी महोत्सवाचं आयोजन काल केलं होतं; यात 65 कंपन्या आणि 15शे तरुण तरुणी सहभागी झाले. एकंदर ६०० जणांना यातून रोजगार मिळाला. त्यातील 300 युवक युवतीना विविध कंपन्यांनी तात्काळ रोजगार पत्र दिलं.

## रोहितपवार

राज्यातील कंत्राटदारांच्या थकीत पैशावरून आमदार रोहित पवार यांनी राज्य शासनावर टीका केली आहे. ते आज पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. राज्य सरकारनं  अनेक कंत्राटदारांची दिशाभूल केली आहे; असा आरोप रोहित पवार यांनी केला.

## टिळकजयंती

लोकमान्य टिळक यांच्या जयंतीनिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लोकमान्य टिळक अध्यासन आणि गणित विभागानं लोकमान्य टिळक स्मृती व्याख्यानमालेचं आयोजन केलं होतं. यामध्ये प्रा. डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी “लोकमान्यांचं गीतारहस्य तथा कर्मयोगशास्त्र” या विषयावर आपले विचार मांडले.

## रोपवाटिकांचं नुकसान

पुणे जिल्ह्यात गेल्या महिन्यात झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि अतिवृष्टीमुळे चार तालुक्यांतील 1 हजार 275 हेक्टरवरील भात रोपांचं नुकसान झालं आहे. वेल्हा, मुळशी, मावळ  आणि हवेली या तालुक्यांतील 3 हजार 321 शेतकऱ्यांना 1 कोटी 8 लाख 43 हजार रुपयांची नुकसानभरपाई मिळावी, असा प्रस्ताव जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी विभागीय महसूल आयुक्तांकडे पाठवला आहे.

## संवादसत्र

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शिक्षण विभागाने आयुक्त शेखर सिंह यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक-मुख्याध्यापक संवाद सत्राचं आयोजन केलं

होतं. यात शैक्षणिक उपक्रमांची प्रगती आणि २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठीच्या महत्त्वाकांक्षी योजना सादर करण्यात आल्या. गुणवंत विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज अधून मधून हलका पाऊस सुरू आहे. आज कमाल तापमान २७ तर किमान तापमान २१ पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही शहरात हलक्या पावसाची आणि घाट परिसरात मुसळधार पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.